# रक्तदान शिबिर

रक्तदान शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्तदान शिबिर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबिराचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. शिबिरात 54 रक्तदात्यांनी रक्तदान करत उस्फूर्त प्रतिसाद दिला. तर शिबिरात 100 जणांनी मरणोत्तर नेत्रदान करण्याचा संकल्प करत नोंदणी केली.

विद्यापीठाच्या मुकंदनगर संकुलातील गौरीताई टिळक सभागृहात 25 फेब्रुवारी रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 3.00 यावेळेत हे शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. गीताली टिळक, प्र कुलसचिव सुवर्णा साठे यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरासाठी नोबल रूग्णालय व रक्तपेढी, पुणे चे विशेष सहकार्य लाभले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. ओमकार कणे, प्रा. रोहन बावडेकर, डॉ. निलेश उपाध्ये, डॉ. प्रकाश यादव, नीता कदम यांनी प्रयन्त केले. शिबिरात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी मोठ्या संख्यने भाग घेतला.

